मार्गदर्शन

# कोरडवाहू जमिनीमध्ये करा करवंदाची लागवड



प्रा.डॉ. लक्ष्मण सुरनर
(मो.नं. ८८०६३८६३६४)
उद्यानविद्या विभाग, कृषी महाविद्यालय,
ता. रेणापूर, जि. लातूर







करवंदाच्या जाती फळाच्या आणि गराच्या रंगावरून ठरविल्या जातात. करवंदाच्या स्थानिक भरपूर जाती आहेत. मात्र त्यात निवड पद्धतीने तयार केलेली 'कोकण बोल्ड' नावाची नवीन जात डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने प्रसारित केली आहे. या जातीची फळे मोठी (१२-१६ ग्रॅम) व घोसाने लागतात तसेच फळाची प्रत उत्कृष्ट आहे.

करवंद हे एक अत्यंत दुर्लक्षित व काटक झुडूपवर्गीय फळपीक असून, ते काटेरी व सदापर्णी अॅत्पोसायनेसी कुळातील आहे. त्याचे शास्त्रीय नाव कॅरिसा करंडास असे आहे. करवंदाचे मूळ स्थान भारत असून भारतामध्ये सर्वत्र याची झाडे आढळून येतात. हे भारतातील वनांत विशेषत: शुष्क व खडकाळ भागांत आढळते. याशिवाय श्रीलंका, जावा, तिमोर येथेही ते आढळते. ३ ते ४ मीटर उंचीचे हिरवेगार दिसणारे हे झाड फार काटक असून निसर्गाच्या भरवशावर वाढते. खोड आखूड असून फांद्या व लांब काटे द्विभक्त असतात. पाने साधी, समोरासमोर, लंबगोल, चिवट, गुळगुळीत आणि चकचकीत दिसतात. फूल किंवा फळ तोडल्यास पांढरा चीक येतो. फुले पांढरी, अपछत्राकृती व लवदार असतात. करवंदाच्या जाळ्या डोंगरघळीत व जंगलात नेहमी आढळतात.

करवंदाचे कच्चे फळ स्कर्व्हीनाशक तसेच स्तंभक आहे. पिकलेली फळे शीतकारक व भूक वाढविणारी असतात. मूळ कडू व कृमिनाशक आहे. मुदतीच्या तापावर पानांचा काढा गुणकारी ठरतो, असे आयुर्वेदात वर्णन आहे. करवंदाच्या कच्च्या फळांपासून लोणचे तयार करतात. लाकूड कठीण व गुळगुळीत असते. त्यापासून चमचे, फण्या व इतर कातीव वस्तू तयार करतात. हे मुख्यतः कुंपणासाठी मोठ्या प्रमाणावर त्याची लागवड केली जाते. झाडाच्या फांद्यांना काटे असल्यामुळे गुरे खात नाहीत.

**लागवड** : करवंद हलक्या, मुरमाड, डोंगरी भागात कमी खर्चामध्ये येणारे पीक आहे. म्हणून शेतामध्ये किंवा बांधावर करवंद लागवड करावी. एक ते दीड वर्ष वयाची रोपे पावसाळ्यात लावल्यास याची वाढ चांगली होते. पावसाळ्यात लागवड करणे अधिक चांगले. करवंदाची लागवड मुखत्त्वेकरून कायमच्या ठिकाणी बिया लावून किंवा रोपे तयार करून करतात. ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात पिकलेली व निरोगी फळे तोडून त्यातील बी काढून- जर्मिनेटर ५० मि.लि. + १ लि. पाणी या द्रावणात बीजप्रक्रिया करून ताबडतोब गादीवाफ्यावर पेरावे. साधारणत: ३ ते ४ आठवड्यांत बी उगवते. अशी रोपे फेब्रुवारीच्या सुरुवातीस लागवडीस येतात. त्यानंतर सोयीनुसार अशी रोपे कायम जागी लावावीत.

कुंपणासाठी लागवड करताना दोन रोपांतील अंतर ९० ते १५० सें.मी. ठेवावे. फळबाग लागवड तीन ते चार मीटर अंतरावर रोपटे लावून करावी. लागवड केल्यावर कलमांना आधार द्यावा. लागवडीसाठी एप्रिल-मे महिन्यात ४५ x ४५ x ४५ सें.मी. आकाराचे खड्डे खणून माती, चांगले कुजलेले शेणखत (दोन किलो) आणि २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट मिसळून पाऊस सुरू होण्याच्या अगोदर भरून ठेवावे.

**जाती** : करवंदाच्या जाती फळाच्या आणि गराच्या रंगावरून ठरविल्या जातात. करवंदाच्या स्थानिक भरपूर जाती आहेत. मात्र त्यात निवड पद्धतीने तयार केलेली 'कोकण बोल्ड' नावाची नवीन जात डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने प्रसारित केली आहे. या जातीची फळे मोठी (१२-१६ ग्रॅम) व घोसाने लागतात तसेच फळाची प्रत उत्कृष्ट आहे. फळे गोलाकार असून गराचे प्रमाण ९२ टक्के आहे. फळांचा टिकाऊपणा चांगला आहे. फळे गडद काळ्या रंगाची असतात. कच्च्या व पक्व फळांपासून विविध प्रक्रिया केलेले टिकाऊ पदार्थ तयार करता येतात.

**खत व्यवस्थापन** : कुंपण म्हणून लावलेल्या रोपास जास्त खत लागत नाही. प्रत्येक वर्षी जून- जुलै महिन्यात १० ते १५ किलो चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट द्यावे. मात्र फळबाग म्हणून लावलेल्या रोपास तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षापासून शिफारस केलेली मात्रा प्रत्येक कलमास जुलै-ऑगस्ट महिन्यात द्यावी. २५ किलो शेणखत, १०० ग्रॅम युरिया आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत द्यावे. यामुळे जोमदार वाढ व जास्त उत्पादन मिळते. जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यामध्ये १० लिटर देशी गायीचे गोमूत्र रिंग पद्धतीने किंवा ठिबकमधून दिल्यास फूल आणि फळधारणा लवकर व जास्त होण्यास मदत होते.

**पाणी व्यवस्थापन** : रोप लावल्यानंतर हिवाळ्यात १५ दिवसांच्या अंतराने व उन्हाळ्यात आठवड्याच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या लागवडीच्या पहिल्या वर्षी द्याव्यात. असे केल्याने रोपांची वाढ जोमदारपणे होईल व रोपांचे जगण्याचे प्रमाण वाढेल. प्रतिकलमास सुमारे २० लिटर पाणी प्रत्येक पाळीस द्यावे. दुसऱ्या वर्षापासून कलमास पाणी देण्याची आवश्यकता नाही.

**छाटणी व्यवस्थापन** : करवंद हे काटेरी- झुडूपवर्गीय असल्यामुळे एका किंवा दुहेरी फांदीवर योग्य आकार द्यावा. फळधारणा झालेल्या झाडांना साधारणपणे कोणत्याही छाटणीची आवश्यकता नसते. परंतु शेतामध्ये किंवा बागेमध्ये काम किंवा ये-जा करण्यास अडचण होऊ नये. यासाठी चौथ्या किंवा पाचव्या वर्षापासून दरवर्षी फळे काढणीनंतर मे- जून महिन्यात काही प्रमाणात फांद्यांची छाटणी करावी. रोगट व वाळलेल्या फांद्या काढून टाकाव्यात.

**तोडणी आणि उत्पादन** : करवंदाच्या बागेपासून तीन वर्षांनी उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. झाड जसजसे मोठे होत जाईल, तसतशी उत्पादनात वाढ होत जाते. प्रत्येक वर्षी फळधारणा होते. कोकण किंवा घाटमाथ्यावरती फेब्रुवारी ते मार्च महिन्यात फुलाचा बहर येतो. एप्रिल किंवा मे मध्ये फळे पिकण्यास सुरुवात होते. मराठवाडा व विदर्भात सामान्यपणे एप्रिलनंतर फुलधारणा होऊन जुलै-ऑगस्टमध्ये फळे येतात. सर्व फळे साधारणपणे एका वेळी परिपक्व होत नाहीत. म्हणून तोडणी साधारणपणे २ ते ४ वेळा करावी. पिकलेली फळे नाशवंत असतात.

साधारणपणे प्रत्येक झाडावर ३५ ते ४० किलोपर्यंत टवटवीत गुलाबी करवंदे मिळतात. एकरी सुमारे चार ते पाच टनांपर्यंत उत्पादन मिळते. करवंदे हे मुळातच काटेरी, झुडूपवर्गीय डोंगरदऱ्यात येणारे जंगली फळझाड. मात्र हे कमी खर्चामध्ये येणारे पीक व चांगला पैसा देणारे पीक असल्याने त्याची लागवड शेतकरी बांधवानी करायला हवी. ■